जिल्हा परिषद, यवतमाळ
मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय,
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जि.प. प्रशासकीय इमारत आर्णी रोड, यवतमाळ ४४५ ००१

ई मेल- :- eopriytl@gmail.com संकेतस्थळ :- www.zpyavatmal.gov.in

जा.क्रं /यजिप/खाप्राशा/आस्था-०९/ई- ऑफीस/कावि- १००१/४६/२०२६

१) अध्यक्ष -

२) मुख्याध्यापक — सेंट अलॉशिएस इंग्लिश मिडीयम स्कुल,
मोहाफाटा धामणगाव रोड यवतमाळ

**विषय -:** बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम , २००९ यांच्या कलम १८ च्या प्रजोजनार्थ ,बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम , २०११ याच्या नियम ११, पोट-नियम (४) अन्वये शाळांना मान्याता प्रमाणपत्र देण्याबाबत.

उपरोक्त विषयान्वये ऑनलाईन ई ऑफीस क्रं ३९९०२१६/२०२६ दि. २४/०३/२०२६ अन्वये प्राप्त प्रस्ताव आणि त्यांनतर या सदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यावहार / शाळेची केलेली तपासणी च्या आधारे

मी शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद यवतमाळ दि. ०१/०४/२०२६ ते ३१/०३/२०२९ पर्यंत या कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात इयत्ता ५ वी ते ८ वी करीता उपरोक्त शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे. वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पुर्ततेच्या अधीन आहे.

१) मान्यतेचा कालावधी वाढवुन मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.

२) बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम , २००९ (जो डपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकाना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम , २०११ (जोडपत्र दोन) मधिल तरतुदीचे शाळा पालन करील.

३) शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालाकाना, पहिल्या इयत्तेत , त्या इयत्तेतील विदयार्थी संख्येच्या किमाण २५% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यंत त्यांना मोफत सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्ताच्या बाबतीत्र देखील या प्रमाणाचे अनुपालक करण्यात येईल.

४) परिच्छेद ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरीता शाळेला अधिनियमाचा कलम १२(२) नुसार प्रतिपुर्ती मिळेल. अशीप्रतिपुर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.

५) संस्था/ शाळा कोणतीही फी वसुल करणार नाही आणि कोंणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्याच्या किंवातिच्या माता पित्यास किंवा पालकास भाग पडणार नाही.

६) कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी , धर्म जात किंवा वंश जन्म ठिकाण किंवा यापैकि कोणत्याही कारणास्तव शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही .

७) (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखुन ठेवले जाणर नाहींकिंवा प्राथकि शिक्षण पुर्ण होईपर्यंत शाळेतुन काढुन टाकण्यात येणार नाही.

(दोन) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परिक्षा उतीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(चार) प्राथमिक शिक्षण पुर्ण केलेल्या प्रत्येक बालकास , नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

(पाच) विकंलाग / विशेष गरजा असलेल्या विदयार्थ्यांचा अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करण्यात येईल

(सहा) अधिनियमाच्या कलम २३ (१) अन्वये निर्धारित केलेल्या किमान अर्हता धारण करणा-या शिक्षंकाची नियुक्तीकरण्यात येईल. परंतु आणखी असे कि, अधिनिंयाच्या प्रांरभाच्या दिनांकास किमाण अर्हता धारण न करणा-याशिक्षकांना अंशी किमान अर्हता ५ वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

PRINCIPAL
St.Aloysius Eng.Med.School
Mohaphata Dhamnangaon Road
Yavatmal

(सात) अधिनियमाचच्या कलम २४ (१) मध्ये विनिदिष्ट केलेल त्याची / तिची/ कर्तव्ये शिक्षक पार पडतील आणि (आठ) शिक्षकाने/शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वत: गुतंवुण घेऊ नये याची सुनिश्चीती शाळा करील.

८) शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमांच्या आधारे तयार केलेल्या पाठयक्रमांचे पालन करील.

९) शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विदयार्थ्यांना प्रवेश देईल.

१०) शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिदिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील मागील

- तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या.
- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ
- एकुण बांधकाम क्षेत्र
- खेळाच्या मैदानाच्या क्षेत्रफळ.
- वर्गखोल्याची संख्या
- कार्याल नि भंडार नि मुख्याध्यापकाची खोली
- मुलांसाठी व मुलीसाठी स्वंतत्र प्रसाधन गृहे जे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल.
- पिण्याच्या पाण्याची सुविधा
- दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाकघर
- अध्यापन अध्ययन साहित्य / खेळ व क्रिडाविषयक सामग्री / ग्रंथालय याची उपलब्धता
- वाचन साहीत्य विनासायस उपलब्धता

११) मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया शाळेच्या नावाने शाळे परिसरात किंवा इतरत्र , चालविता येणार नाहीत.

१२) शाळेची इमारत व इतर बांधकाम किंवा क्रिडागण हे केवळ शिक्षणाच्या केवल कौशल्या विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील .

१३) शाळा सोसायटी नोंदणी अधिनियम , १८६० (१८६ ० चा २१) किंवा मुबंई सार्वजनिक वि वस्त व्यवस्ता अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१४) शाळा कोणत्याही व्यक्तीच्या , गटाच्या किंवा व्यक्ती संघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायदया करीता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही .

१५) शाळेचे लेखे, सनदी लेखापालाकडुन लेखापरिक्षित व प्रमाणित करून घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेखाविवरणपत्र तयार करावीत . प्रत्येक एका विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिका-यांकडे पाठविण्यात यावी.

१६) तुमच्या शाळेला मिळालेल्या मान्यता संकेताक २७१४१५०७६०४ असा आहे. हा या कार्यालयाशी कोणताही पत्र व्यवहार करताना कृपया तो नमुद करावा . याची नोंद घ्यावी.

१७) शिक्षण संचालक/ जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पुर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजाकरीता त्रुटी दुर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सुचनाचे पालन करावे.

१८) सस्थेच्या नोंदणीचे कोणतेही नूतनीकरण केल्याची सुनिश्चित करावी.

१९) जोडपत्र ' तीन नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.

(सेंट अलॉशिएस इग्लिश मिडीयम स्कुल,मोहाफाटा धामणगाव रोड यवतमाळ)

Digitally signed by
Prakash Madhusudan Mishra
Date: 13-04-2026 17:38:44

**शिक्षणधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद यवतमाळ**

CS Scanned with CamScanner